| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **MHND160000452020** | दाखल दिनांक | : | ०६/०१/२०२० | | |
| | नोंदणी दिनांक | : | ०६/०१/२०२० | | |
| | निकाल दिनांक | : | ०५/०६/२०२६ | | |
| | कालावधी | : | वर्षे | महिने | दिवस |
| | | | ०६ | ०४ | ३० |

## प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, हदगांव जि. नांदेड यांच्या न्यायालयात
## (पिठासीन अधिकारीः अमरजीत भारतराव जाधव)

**नियमीत फौजदारी खटला क्र. ०४/२०२०** **निशाणी क्र. –८६**

### फॉर्म – अ

| | |
|---|---|
| तक्रारदार / फिर्यादी | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस स्टेशन हदगाव, तामसा ता. हदगाव, जि. नांदेड |
| प्रतिनिधीत्व | शासनातर्फे विद्वान विधिज्ञ श्री. टी.जे. मोमीन |
| आरोपी | **एकनाथ किशनराव सुर्यवंशी**<br>वयः ४१ वर्षे, व्यवसायः चालक,<br>रा. पिंपळकौठा,गोपालचावडी ता.मुदखेड जि. नांदेड. |
| प्रतिनिधीत्व | आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. बी.पी.दुगाळे |

### फॉर्म – ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख वेळ व स्थळ | दि.१४.०८.२०१९ रोजी रात्री १८.०० वाजताच्या सुमारास मौ. तामसा ता. हदगाव. जि. नांदेड |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १४.०८.२०१९ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | १०.०२.२०२३ |
| पुरावा सुरु होण्याचा दिनांक | १०.०२.२०२३ |
| ज्या दिवशी निकाल राखुन ठेवला तो दिनांक | ०५.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०५.०६.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, | निरंक. |

| | |
|---|---|
| जर असेल तर. | |

**फॉर्म – क**

| आरोपी अ.क्र. | आरोपीचे नाव | अटकेच दिनांक | जामीन दिल्याचा दिनांक | गुन्हा | निर्दोष / दोषी | शिक्षा ठोठावली | फौ.प्र.सं.च्या कलम ४२८ च्या उद्देशाने अटकेत ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **एकनाथ किशनराव सुर्यवंशी** | फौ.प्र.सं. चे कलम ४१(अ) प्रमाणे नोटीसवर | २२.११.२१ | प्राण्यांना निर्दयीपणे वागणुक प्रतिबंध अधिनियम कलम ११(१)(ड) , मोटार वाहन कायदा कलम ८३/१७७ व भादवीचे कलम १०९ प्रमाणे | निर्दोष | – | – |

**फॉर्म – ड**

**फिर्यादी/बचाव पक्ष/न्यायालय/साक्षीदारांची यादी**

**(अ) फिर्यादी साक्षीदारांची यादी.**

| अ.क्र. | नाव | निशानी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | गुलाब बदु आडे | २२ | साक्षीदार |
| सा.क्र.२ | भगवान दिगांबर शिंदे | २६ | साक्षीदार |
| सा.क्र.३ | विश्वास दत्तात्रय वासकर | २७ | साक्षीदार |
| सा.क्र.४ | गणपत लक्ष्मण माळकोटे | २८ | साक्षीदार |
| सा.क्र.५ | सुनिल मारोती कावळे | ३० | साक्षीदार |
| सा.क्र.६ | दामाजी गोविंदराव सुर्यवंशी | ३५ | घटनास्थळ व जप्ती पंच |
| सा.क्र.७ | साहेबराव शंकर बामने | ३८ | घटनास्थळ व जप्ती पंच |

| | | | |
|---|---|---|---|
| सा.क्र.८ | नामदेव शिवाजी मददे | ४९ | फिर्यादी |
| सा.क्र.९ | डॉ.अजय काशीनाथ मुस्तारे | ६३ | वैदयकिय अधिकारी |
| सा.क्र.१० | केशव रामचंद्र राठोड | ७२ | तपासिक अधिकारी |

**(ब) बचाव पक्ष साक्षीदारांची यादी.**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

**(क) न्यायालय साक्षीदारांची यादी.**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

**<u>फॉर्म – इ</u>**

**फिर्यादी/बचाव पक्ष/न्यायालय/निशाणी क्रमांक यादी**

**(अ) फिर्यादी नि.क्र.यादी.**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | **३६ व ३७** | घटनास्थळ व जप्ती पंचनामातील अ.क्र.१ वरील सही |
| २. | **३९ व ४०** | घटनास्थळ व जप्ती पंचनामातील अ.क्र.२ वरील सही |
| ३. | **५०** | फिर्याद |
| ४. | **५१** | छापिल प्रथम खबर अहवाल |
| ५. | **६४** | पशुंची तपासणी करणेबाबतचे पत्र |
| ६. | **६५** | वैदयकिय प्रमाणपत्र |
| ७. | **७३** | घटनास्थळ पंचनामा |
| ८. | **७४** | जप्ती पंचनामा |
| ९. | **७५** | मुददेमाल पावती |
| १०. | **७६** | साक्षीदार क्रं ०३ च्या जबाबातील |

| | | |
|---|---|---|
| | | अधोरेखांकित भाग 'अ' |

**(ब) बचाव पक्ष नि.क्र.यादी.**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**(क) न्यायालय नि.क्र.यादी.**

| अ.क्र. | वर्णन | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | दोषारोप | **१५** |
| २. | आरोपीचा जबाब | **१६** |

**(ड) मुद्देमाल वस्तु.**

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | जप्त प्राण्यांचे छायाचित्र | अ– १ ते अ–७ |

**– न्या य नि र्ण य –**
**(पारीत दिनांक ०५ जून, २०२६)**

आरोपीविरुध्द प्राण्यांना निर्दयीपणे वागणुक प्रतिबंध करणे अधिनियम १९६० चे कलम ११(१)(ड),मोटार वाहन कायदा कलम ८३/१७७ व भादवीचे कलम १०९ प्रमाणे (येथून पुढे संक्षिप्तपणे भा.द.सं.) संपरिक्षा घेण्यात आली.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की,**

**०२.** फिर्यादी–नामदेव शिवाजीराव मददे, पोलीस निरीक्षक तामसा पोलीस स्टेशन, ता. हदगाव, जि. नांदेड (यांना येथून पुढे फिर्यादी असे संबोधले आहे.) हे दि १४/०८/२०१९ रोजी तामसा येथे हजर असतांना त्यांना गुप्त बातमी मिळाली की, एक आयचर ज्याचा क्रं एम एच २६ ए.डी. १६२६ या गाडीमध्ये म्हैस व बैल जनावरांना त्रास होईल अशा रितीने खचाखच भरुन अवैधरित्या प्रवाशी वाहतुक करीत आहे, अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदर माहिती छत्रपती चौक तामसा येथील नाकाबंदी पॉईण्टवरील पोहेकॉ १७९८ श्री.आडे यांना सांगितली. त्यानंतर फिर्यादी यांनी लागलीच नाकाबंदी पॉईण्टवर जावून सोबत पोहेकॉ १७९८ श्री आडे,

होमगार्ड १०६० भगवान शिंदे, होमगार्ड १०५५ सुनिल कावळे, होमगार्ड १०५८ गणपत माळकोटे, होमगार्ड १०२४ विश्वास वासकर असे सर्वजण मिळून १८.०० वाजताच्या सुमारास हदगावकडून येणारा आयचर क्रं एम एच २६ ए.डी. १६२६ येत असल्याचे दिसल्याने १८.१५ वाजताच्या सुमारास सदरचे वाहन थांबवून चालकाचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव एकनाथ किशनराव सुर्यवंशी असल्याचे सांगितले. त्यांना वाहनात काय आहे असे विचारले असता त्यांनी उमरखेड येथील बाजार येथे घेवून गेलो होतो, ती जनावारे परत मुदखेड येथे घेवून जात असल्याबाबत सांगितले. त्यांनी सदर वाहनांची पाहणी केली असता, त्या वाहनाच्या पाठीमागे ०८ जनावरे एकावर एक पडलेले खचाखच भरलेले दिसून आले. त्यांना जनावरे वाहतुक करण्याचा परवाना विचारला असता तो नसल्याचे त्यांनी सांगितले. सदर वाहनाची पोलीस स्टेशनला आणून त्यांची पाहणी केली असता, एक आयशर कंपनीचे वाहन क्र एम.एच–२६–ए.डी–१६२६, यामध्ये एक काळया रंगाची म्हैस वय अंदाजे ३ वर्षे, तीन काळया रंगाच्या म्हशी अंदाजे वय प्रत्येकी ०५ वर्षे , दोन काळया रंगाच्या म्हशी वय अंदाजे ०६ वर्षे प्रत्येकी, एक हरण्या रंगाचा उभे शिंग असलेला बैल वय अंदाजे ४ वर्षे व एक पांढ–या रंगाचा बैल वय अंदाजे ०७ वर्षे असे एकूण ०६ म्हशी व०२ बैल असल्याचे आढळून आले. सदर ताब्यात घेतलेल्या जनावरांची पशुवैदयकिय अधिकारी यांच्याकडून वैदयकिय तपासणी केली व त्यानंतर त्यांनी सदर घटनेबाबत तामसा पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली.

**०३.** तामसा पोलीस ठाणे अंमलदार यांनी वर नमुद केल्यानुसार गुन्हा क्र.८५/२०१९, प्राण्यांना निर्दयीपणे वागणुक प्रतिबंध करणे अधिनियम १९६० चे कलम ११(१)(घ)(ड), महाराष्ट्र पोलीस अधिनियमचे कलम ११९, मोटार वाहन कायदा कलम ८३/१७७ व भादवीचे कलम १०९ प्रमाणे गुन्हा नोंदविला व त्याचा तपास स.पो.उप.नि. श्री.के.आर राठोड यांनी केला. तपासी अंमलदार यांनी गुन्हयाच्या तपासादरम्यान साक्षीदारांचे जाब जबाब नोंदविले, पशुंची वैदयकिय तपासणी केल्याचे प्रमाणपत्र हस्तगत केले. घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा

तयारक केला. प्राण्यांचे छायाचित्र काढून प्राण्यांना मालाकांच्या ताब्यात परत दिले. तपासाअंती आरोपींविरुध्द प्राण्यांना निर्दयीपणे वागणुक प्रतिबंध करणे अधिनियम १९६० चे कलम ११(१)(घ)(ड), महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११९, मोटार वाहन कायदा कलम ८३/१७७ व भादवीचे कलम १०९ नुसार न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** माझे पुर्व पिठासन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द प्राण्यांना निर्दयीपणे वागणुक प्रतिबंध करणे अधिनियम १९६० कलम ११(१)(ड), मोटार वाहन कायदा कलम ८३/१७७ व भादवीचे कलम १०९ प्रमाणे दोषारोप (नि.क्र.१५) निश्चित केला व आरोपीस समजावून सांगितला असता त्याने गुन्हा नाकबूल करून संपरीक्षा चालविण्याची विनंती केली. आरोपीवरील दोषारोप सिध्द करणेसाठी अभियोग पक्षाने एकुण १० साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम ३१३ प्रमाणे आरोपींचे निवेदन/जबाब (निशाणी क्र.८०) नोंदविले.

**०५.** अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व आरोपींचे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले त्यावरून माझे विचारार्थ निघालेले मुद्दे व निष्कर्ष मी कारणेमिमांसासहित खालीलप्रमाणे नोंदवीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि. १४/०८/२०१९ रोजी रात्री १८.०० वाजताच्या दरम्याने मौजे तामसा ता. हदगाव, जि. नांदेड येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील आयचर वाहन क्रं एम–एच–२६–ए.डी–१६२६ मध्ये एकूण ०६ म्हशी व ०२ बैल असे एकूण ०८ प्राणी/जनावरे खच्चाखच भरुन घेवून जातांना त्यांना ईजा होईल व त्यांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीमध्ये निर्दयीपणे वाहतुक करीत असतांना मिळून आला व त्याद्वारे त्याने प्राण्यांना निर्दयीपणे वागणुक प्रतिबंध | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | करणे अधिनियम १९६० चे कलम **११(१)(ड)** अन्वये अपराध केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | |
| २. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, उपरोक्त तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील नमुद वाहनामध्ये परवानगीपेक्षा जास्त वजन भरुन म्हणजेच ०८ प्राणी/जनावरे बेकायदेशिररित्या वाहून नेत असतांना आढळून आला व त्याद्वारे त्याने मोटार वाहन कायदा कलम **८३/१७७** प्रमाणे गुन्हा केला ? | **नाही.** |
| ३. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपीने त्याच्या वाहनातून सदर प्राण्यांना बेकायदेशिर वाहतुक करुन अथवा प्राण्यांच्या मालकांना वरील गुन्हा करण्यास उत्तेजित केले व त्याद्वारे त्याने **भादवीचे कलम १०९** प्रमाणे अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नाही.** |
| ४. | आदेश काय ? | **अंतिम आदेशा प्रमाणे** |

## – <u>का र ण मि मां सा</u> –

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीताः</u>**

**०६.** वरील मुद्दे एकाच घटनेशी संबंधीत असल्याने पुनरावृत्ती टाळण्याकरिता एकत्रीत विचारात घेण्यात आले आहेत.

**०७.** सदर प्रकरणात आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाला ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे की, घटनेच्या वेळेस आरोपीच्या ताब्यातील वाहनात एकूण ०८ प्राणी/जनावरे त्यांना ईजा होईल व त्यांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीमध्ये, निर्दयीपणे, खचाखच भरुन त्यांची

बेकायदेशिर वाहतुक करतांना आढळून आला व नमुद वाहनामध्ये परवानगीपेक्षा जास्त वजन भरुन म्हणजेच ०८ प्राणी/जनावरे बेकायदेशिररित्या वाहून नेत असतांना आढळून आला.

**०८.** सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.टी.जे.मोमीन यांचा युक्तीवाद असा की, सदर प्रकरणात अभियोगपक्षाने एकूण १० साक्षीदारांची साक्ष नोंदविली असून त्यापैकी ०७ साक्षीदारांनी घटनेबाबत कथन केले आहे. फिर्यादीने घटनेची फिर्याद सिध्द केली असून घटनास्थळ व जप्ती पंचनामे हे तपासी अधिकारी यांच्यामार्फत सिध्द केले आहेत. तसेच प्राण्यांची वैदयकिय तपासणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र वैदयकिय अधिकारी यांनी त्यांच्या साक्षीमधून सिध्द केले आहे. त्यामुळे अभिलेखावरील पुराव्यावरुन आरोपींवरील दोषारोप सिध्द होत आहेत असा युक्तीवाद केला.

**०९.** याउलट आरोपीचे विधीज्ञ श्री.बी.पी.दुगाळे यांचा युक्तीवाद असा की, फिर्यादी व ईतर साक्षीदार यांनी जरी घटनेबाबत सांगितले असले तरी, सदरचे प्राणी व टेम्पो हे आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आले याबाबत घटनास्थळ पंच व जप्ती पंच यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. तसेच घटनास्थळ पंच वगळता इतर सर्व साक्षीदार हे पोलीस कर्मचारी असून घटनेच्यावेळी इतर स्वतंत्र साक्षीदार उपस्थित असतांना देखील अभियोग पक्षाने एकाही स्वंतत्र साक्षीदाराची साक्ष नोंदविली नाही. पोलीस साक्षीदारांच्या साक्षीमध्ये सदर वाहनात नेमक्या किती म्हशी व बैल होते याबाबत तफावत असून पोलीस साक्षीदारांना देखील घटनास्थळ पंचनमा

कोठे केला याबाबत सांगता आले नाही. तसेच पोलीस साक्षीदारांना सदर वाहनाचा क्रमांक देखील सांगता आला नाही. त्यामुळे सदर पोलीस साक्षीदार घटनेच्या वेळी घटनास्थळी हजर होते याबाबत संशय निर्माण होतो. केवळ फिर्यादी व तपासी अधिकारी यांच्या साक्षीवरुन आरोपीवरील आरोप सिध्द होत नाहीत. सबब आरोपीस निर्दोष मुक्त करण्याची विनंती केली.

**१०.** अभियोगपक्षाचे साक्षीदार पोकॉ. श्री.जी.बी. आडे (अ.सा.क्रं.१), हे प्रत्यक्षदर्शी पोलीस कॉन्स्टेबल साक्षीदार असून त्यांच्या साक्षीमधून असे दिसून येते की, दि १४/०८/२०१९ रोजी ते तामसा पोलीस स्टेशन येथे कार्यरत असतांना त्यांना त्यांचे वरिष्ठ श्री.मददे यांनी तामसा येथील नवीन बसस्टॉप येथे बोलाविले. त्याठिकाणी एक टेम्पो वाहन क्रं एम–२६– ए.डी–२१२६ हा जनावरांसह पकडला होता. त्यामध्ये ०६ म्हशी आणि ०२ बैल असे प्राणी होते. सदर वाहन काशीनाथ हा चालवित होता. सदर वाहन हे उमरखेड येथून मुदखेड येथे जनावरांसह भरगच्च भरुन नेत होता. वरिष्ठांनी वाहन जनावरांसह आरोपींला घेवून पोलीस ठाणे येथे आले. त्यानंतर घटनेबाबत फिर्याद श्री.मददे यांनी दाखल केली. आरोपीस पाहिल्यास ओळखू शकतो असे त्यांनी कथन केले.

**११.** आरोपीच्या वकीलामार्फत त्याचा उलटतपास घेण्यात आला असता त्यामध्ये त्यांनी मान्य केले की, श्री मददे यांनी त्यांना दुपारी बोलाविले होते. बोलाविल्यानंतर ते १५ मिनिटात बसस्टॉप येथे पोहोचले. घटनास्थळाच्या

आजूबाजूला बरीच दुकाने आहेत. घटनास्थळाचा पंचनामा कुठे केला याबाबत त्यांना माहित नसल्याचे कथन केले.

**१२.** सदर साक्षीदार हे त्यांचे वरिष्ठ श्री.मददे, फिर्यादी यांनी त्यांना घटनास्थळी बोलाविल्यानंतर ते घटनास्थळी गेले होते. परंतु घटनेची फिर्याद नि.क्रं ५० मधील कथनानुसार व फिर्यादीच्या साक्षीनुसार घटनेपूर्वी छत्रपती चौक तामसा येथे नाकापॉईटंवर पोहेकॉ श्री आडे हे हजर होते व त्यांना ए.पी.आय श्री. एन एस मददे यांनी सदरची माहिती सांगितली होती असे दिसून येते. तसेच वरील साक्षीदाराच्या साक्षीवरुन देखील ते घटनास्थळी पोहोचले तेंव्हा टेम्पो वाहन जनावरांसाह पकडलेला होता. त्यामुळे सदर साक्षीदार हे सदर नाकाबंद पॉईटंवर घटनेपूर्वी उपस्थित होते या फिर्यादीच्या कथनाविरुध्द श्री.जी.बी.आडे (अ.सा.क्रं.१) यांची साक्ष दिसून येते. तसेच सदर साक्षीदाराने वाहनाचा क्रमांक देखील चुकीचा सांगितला असून चालकाचे नाव देखील काशीनाथ असे चुकीचे कथन केले आहे.

**१३.** अभियोगपक्षाचे साक्षीदार होमगार्ड श्री.बी.डी.शिंदे (अ.सा.क्रं.२),हे होमगार्ड असून त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले की, दि १४/०८/२०१९ रोजी ते इतर कर्मचा–यांसह ते तामसा येथे नाकाबंदी करीत असतांना ए.पी.आय मददे यांनी त्यांना माहिती दिली की, हदगाव येथून एका आयशर या वाहनामध्ये काही जनावरे कत्तलीसाठी घेवून जात आहेत. सदर माहितीवरुन त्यांनी वरील वाहन थांबविले. त्याची पाहणी केली असता त्यामध्ये एकूण ०७ म्हशी

व ०१ बैल खचाखच भरुन नेत असल्याचे दिसून आले. सदर वाहनाचा क्रंमाक त्यांना माहित नसून सदरचे वाहन सुर्यवंशी नावाचा इसम चालवित होता. सदर वाहन व वाहनचालक यांना पोलीस ठाणे येथे नेवून त्याच्याविरुध्द कार्यवाही केली. आरोपीस पाहिल्यास ओळखू शकतो असे कथन केले.

**१४.** आरोपीच्या वकीलामार्फत त्याचा उलटतपास घेण्यात आला असता त्यामध्ये त्यांनी मान्य केले की, नाकाबंदीच्या ठिकाणाच्या आजूबाजूला इतर दुकाने आहेत. कार्यवाही सुरु असतांना इतर ८ ते १० लोक जमा झाले होते.

**१५.** अभियोगपक्षाचे साक्षीदार होमगार्ड श्री.व्ही.डी. वासकर (अ.सा.क्रं.३), होमगार्ड हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून दि.१४/०८/२०१९ रोजी ते तामसा पोलीस ठाणे येथे कार्यरत होते. ते छत्रपती चौक येथे नाकाबंदीच्या कर्तव्यावर असतांना ए.पी.आय मददे यांनी माहिती दिली की, उमरखेड येथून एका आयशर वाहनामध्ये काही जनावरे कत्तलीसाठी घेवून जात आहेत. त्या माहितीवरुन त्यांनी सदर वाहन थांबविले. त्यामध्ये ०७ म्हशी व ०१ बैल खचाखच भरुन नेत असल्याचे दिसून आले. सदर वाहन एकनाथ सुर्यवंशी हा चालवित होता. आरोपीला पाहिल्यास ओळखू शकत नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदार हा त्याच्या जबाबाच्या विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी वकीलांनी त्यास उत्तरसूचक प्रश्न विचारले असता त्यामध्ये त्याने केवळ दि १४/०८/२०१९ रोजी आयशर वाहन क्रं एम–एच–२६–ए.डी–१६२६ आरोपी एकनाथ सुर्यवंशी हा चालवित होता हे मान्य करुन त्याच्या

जबाबातील ईतर संपुर्ण मजकुर नाकारला.

**१६.** अभियोगपक्षाचे साक्षीदार होमगार्ड श्री. जी.एल. माळकोटे (अ.सा.क्रं.४), हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून ते दि १४/०८/२०१९ रोजी तामसा पोलीस ठाणे येथे होमगार्ड म्हणून कार्यरत असतांना ईतर कर्मचा-यांसह छत्रपती चौक येथे नाकाबंदी करण्यास हजर होते. त्या दरम्यान ए.पी.आय मददे यांनी त्यांना माहिती दिली की, उमरखेड येथून एका आयशर वाहनामध्ये काही जनावरे कत्तलीसाठी घेवून जात आहेत अशा माहितीवरुन सदर वाहन थांबवून त्याची पाहणी केली असता, त्यामध्ये एकूण ०७ म्हशी व ०१ बैल खचाखच भरुन नेत असल्याचे त्यांना दिसून आले. सदर वाहन एकनाथ सुर्यवंशी हा चालवित होता. सदर वाहनाचा क्रंमाक त्यांना आठवत नसल्याचे कथन केले.

**१७.** आरोपीच्या वकीलामार्फत त्याचा उलटतपास घेण्यात आला असता त्यामध्ये त्याने मान्य केले की, ए.पी.आय मददे यांनी त्यांना घटनेबाबत सायंकाळी ६.०० वाजता माहिती दिली होती. बातमी मिळाल्यानंतर वाहन हे १५ ते २० मिनिटात घटनास्थळी आले. छापा कार्यवाही केली त्यावेळेस त्याठिकाणी १० ते १५ लोक जमा झाले होते.

**१८.** अभियोगपक्षाचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार होमगार्ड श्री. बी.डी.शिंदे (अ.सा.क्रं.२), होमगार्ड श्री.व्ही.डी.वासकर (अ.सा.क्रं.३), होमगार्ड श्री.जी.एल माळकोटे (अ.सा.क्रं.४), हे अभियोगपक्षाचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असूनदेखील सदर

वाहनामध्ये ०७ म्हधी व ०१ बैल असल्याचे कथन केले असून, सदर वाहनाचा क्रंमाक आठवत नसल्याचे कथन केले. परंतु फिर्याद नि.क्रं ५० प्रमाणे सदर टेम्पामध्ये ०६ म्हशी व ०२ बैल असे जनावरे असून सदर तीनही साक्षीदारांच्या साक्षीमध्ये जनावरांच्या संख्येमध्ये तफावत दिसून येते. त्यामुळे सदर साक्षीदार हे पोलीस साक्षीदार असून घटनेच्यावेळी इतर लोक उपस्थित असतांना देखील सदर साक्षीदारांपैकी एकाही स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षाने नोंदविली नाही. त्यामुळे वरील चारही साक्षीदारांची साक्ष ते घटनास्थळी प्रत्यक्ष उपस्थित असल्याबाबतचा विश्वास निर्माण करणारी नाही.

**१९.** अभियोगपक्षाचे साक्षीदार होमगार्ड श्री.एस.एम. कावळे (अ.सा.क्रं.५), हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून ते दि १४/०८/२०१९ रोजी तामसा पोलीस ठाणे येथे होमगार्ड म्हणून कार्यरत असतांना वरिष्ठ अधिका–यांच्या आदेशावरुन नवीन बसस्थानक हदगाव शिवाजी चौक, हदगाव रोड येथे नाकाबंदीकरिता डयुटीवर हजर होते. त्यांच्यासोबत त्यावेळेस पो.कॉ.आडे, होमगार्ड भगवान शिंदे, होमगार्ड गणपत माळकोटे, होमगार्ड विश्वास वासकर हे होते. वरिष्ठांना गुप्त बातमी मिळाली होती की, एका आयशर वाहनामध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक करीत आहेत. सदर माहिती वरिष्ठांनी त्यांना सांगितली. सायंकाळी ६.१५ वाजताच्या दरम्यान एक आयशर गाडी क्रं एम–एच–२६–ए.डी–१६२६ ही गाडी त्यांनी थांबवून त्यांची पाहणी केली असता, त्यामध्ये एकूण ०८ जनावरे खचाखच भरलेल्या स्थितीत

मिळून आले. सदर  वाहन चालकाकडे जनावरे वाहून नेण्याचा परवाना नव्हता. सदर वाहन चालकाने त्याचे नाव एकनाथ सुर्यवंशी रा.पिंपळकौठा ता.मुदखेड जि.नांदेड असे सांगितले. त्यांनी सदर वाहन व जनावरे ताब्यात घेतली व त्यातील जनावरे पशुवैदयकिय अधिकारी यांच्याकडे तपासणीकरिता पाठविली. वाहन चालकाविरुध्द रितसर रिपोर्ट देण्यात आला. ज्या वाहन चालकाच्या ताब्यातून जनावरे जप्त केली त्याला पाहिल्यास ओळखू शकतो असे सांगितले

२०. आरोपीच्या वकीलामार्फत त्याचा उलटतपास घेण्यात आला असता त्यामध्ये त्याने मान्य केले की, घटनेबाबत गुप्त बातमी त्यांना स.पो.नि.मददे यांनी स्वतः दिली. घटनेबाबत गुप्त बातमी त्यांना सायंकाळी ६.०० वाजताच्या दरम्यान मिळाली होती. त्यांना बातमी दिल्यानंतर त्याचठिकाणी स.पो.नि.मददे हे १५ ते २० मिनिटे थांबले होते. घटनास्थळाच्या आजूबाजूला दुकाने आहेत. छापा कार्यवाही केली त्यावेळेस त्याठिकाणी इतर १० ते १५ लोक जमा झाली होती. छापा कार्यवाही करण्याकरिता अंदाजे अर्धा तास इतका वेळ लागला.

२१. सदर साक्षीदार देखील नाकाबंदी कर्तव्यावर हजर होता असे कथन करुन इतर साक्षीदार उपस्थित असल्याचे कथन केले आहे. परंतु सदर सर्व साक्षीदार हे होमगार्ड असून त्यांची नियुक्ती पत्र अथवा कर्तव्य यादी प्रमाणे ते सदर नाकाबंदीवर उपस्थित  होते हे दाखविण्यासाठी तपासी अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील कोणताही दस्तऐवज अभिलेखावर दाखल केला नाही.

२२. अभियोगपक्षाचे साक्षीदार दामाजी गोविंदराव सुर्यवंशी (अ.सा.क्रं.६),साहेबराव शंकर बामने (अ.सा.क्रं.७), हे घटनास्थळ पंचनामावरील जप्ती पंच असून त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये पोलीसांनी त्यांना १५/०८/२०१९ बोलाविले होते परंतु त्यांच्यासमक्ष कोणताही घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला नाही. त्यांनी केवळ दोन्ही पंचनाम्यावरील सहया मान्य केल्या असून पोलीसांनी पंचनामातील मजकुर त्यांना माहित नसल्याचे कथन केले आहे.

२३. सदर साक्षीदार हे घटनास्थळ पंचनामावरील जप्ती पंच साक्षीदार आहेत. सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य न केल्याने घटनास्थळ/जप्ती पंचनामा सिध्द झाला नाही. त्यामुळे अभियोगपक्षास सदरचा पुरावा मदतपूर्ण ठरत नसून आरोपीवरील आरोप सिध्द करण्यासाठी सदर साक्षीदारांचा पुरावा उपयुक्त ठरत नाही.

२४. अभियोगपक्षाचे फिर्यादी साक्षीदार श्री.एन.एस. मददे (अ.सा.क्रं.८), त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, दि. १४/०८/२०१९ रोजी त्यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, आयशर क्रं एम.एच.२६–ए.डी.१६४६ यामध्ये म्हैस आणि बैल खचाखच भरुन त्यांना त्रास होईल अशा पध्दतीने घेवून जात आहेत. छत्रपती चौक, तामसा येथे नाकाबंदी पॉईन्टवर हजर असलेले कर्मचारी गुलाब आडे यांना माहिती दिली व ते स्वतः त्याठिकाणी ताबडतोब गेले. तेथे १८.१५ वाजताच्या सुमारास हदगाव कडून सदरचा आयशर त्यांना येतांना

दिसला. त्याला थांबविले वइ चालकाने त्याचे नाव एककनाथ सुर्यवंशी रा. माळकौठा असे असून व वाहनामध्ये जनावरे आहेत असे सांगितले. त्याबाबत त्याने परवाना नसल्याचे सांगितले. सदर वाहनामध्ये सहा म्हशी व दोन बैल एकमेंकाना त्रास होईल अशा पध्दतीने खचाखच भरलेले दिसून आले. सदर वाहन व बैल यांना पोलीस ठाण्यात घेवून आले. सदर चालकाविरुध्द त्यांनी घटनेबाबत रितसर फिर्याद नि.क्रं ५० दाखल केली. प्रथम खबरी अहवाल नि.क्रं ५१ दाखल आहे. सदर इसमास पाहिल्यास ओळखू शकतो असे सांगितले.

**२५.** आरोपीच्या वकीलामार्फत त्याचा उलटतपास घेण्यात आला असता त्यामध्ये त्यांनी मान्य केले की, त्यांना गुप्त बातमी साधारणतः १८.०० वाजता मिळाली व बातमी मिळाल्यानंतर ते पाच मिनिटात घटनास्थळी पोहोचले. ते घटनास्थळी गेल्यानंतर दहा मिनिटांनी सदर टेम्पो आला. घटनास्थळ हे रहददारीचे ठिकाण असून आजूबाजूला बरीच दुकाने आहेत. घटनास्थळी कार्यवाही करतेवेळी साधारण पंधरा ते वास लोक जमा झाले होते.

**२६.** सदर साक्षीदार हा घटनेचा फिर्यादी असून त्यांनी त्यांना मिळालेली गुप्त बातमी छत्रपती चौक तामसा येथे नाकाबंदी पॉईटंवर हजर असलेले कर्मचारी पोहेकॉ श्री. जी.बी.आडे यांना दिली. परंतु जी.बी.आडे यांनी त्यांच्या साक्षीमध्ये श्री.मददे यांनी त्यांना दुपारी घटनास्थळी बोलाविल्यानंतर ते घटनास्थळी वाहन पकडल्यानंतर पोहोचल्याचे दिसून येते. तसेच घटनास्थळ हे रहददारीचे ठिकाण

असून इतर १५ ते २० लोक जमा झाले होते. असे असतांना घटना घडली त्याचवेळी घटनास्थळ पंचनामा नि.क्रं ७३ व जप्ती पंचनामा नि.क्रं ७४ तयार केल्याचे दिसून येत नाही व तसे तपासी अधिकारी यांनी सदर घटनेचा तपास त्यांच्याकडे दुस–या दिवशी आल्यानंतर तयार केल्याचे मान्य केले आहे. जर फिर्यादीच्या कथनाप्रमाणे सदरचे वाहन दि. १४/०८/२०१९ रोजी सायंकाळी ६.१५ वाजताच्या दरम्यान थांबविण्यात आले तर त्याचवेळी कार्यवाही करतांना घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा का केला नाही याचे उत्तर अभिलेखावरील पुराव्यावरुन दिसून येत नाही.

**२७.** अभियोगपक्षाचे साक्षीदार डॉ.अजय काशीनाथ मुस्तरे (अ.सा.क्रं.९), त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले की, ते दि १४/०८/२०१९ रोजी पशुवैदयकिय अधिकारी ग्रेड–१ या पदावर तामसा येथे कार्यरत होते. सदर दिवशी पोलीस निरीक्षक श्री.मददे यांनी त्यांना ६.०० ते ७.०० वाजताच्या सुमारास फोन करुन कळविले की, काही जनावरे पकडली आहेत. त्यांची वैदयकिय तपासणी करुन तसे प्रमाणपत्र देण्याची विनंती केली. ते पोलीस स्टेशनला गेले. पोलीसांनी सदर जनावरांची वैदयकिय तपासणी करणेबाबत पत्र नि.क्रं ६४ दिले. त्यांनी ०२ बैलांची व ०६ म्हशींची तपासणी केली असता ०२ बैल शेतीसाठी उपयुक्त असल्याचे व ०६ म्हशी या प्रजननसाठी व दुग्ध उत्पादनाकरिता उपयुक्त असल्याचे कथन केले. सदर प्राण्यांना तपासल्यानंतर वैदयकिय प्रमाणपत्र नि.क्रं ६५ प्रमाणे त्यांनी दिल्याचे कथन

केले.

२८. आरोपीच्या वकीलामार्फत त्याचा उलटतपास घेण्यात आला असता त्यामध्ये त्यांनी मान्य केले की, सदर दिवशी त्यांची कामकाजाची वेळ सकाळी ९.०० ते ४.३० पर्यत होती. पोलीस निरीक्षक मददे यांनी त्यांना सायंकाळी ५.३० ते ६.०० वाजण्याच्या सुमारास मोबाईलवर फोन केला होता. त्यावेळी ते न्हावा गावात जनावरांची तपासणी करण्यासाठी गेले होते. न्हावा येथून पोलीस ठाण्यात येण्यासाठी सुमारे १५ मिनिटे लागतात. ते पोलीस ठाण्यात गेले असता, त्यावेळी त्यांच्याकडे कार्यालयाची कोणतीही नोंदवही नव्हती. ते पोलीस ठाण्यात गेल्यानंतर पोलीस निरीक्षकांनी त्यांना वरील नमुद पत्र दिले होते.

२९. सदर साक्षीदार हे पशुवैदयकिय अधिकारी असून त्यांनी दिलेले वैदयकिय प्रमाणपत्र नि.क्रं ६५ प्रमाणे सदर ०६ म्हशी व ०२ बैल यांना कोणतीही इजा नसून ते  तंदुरुस्त असल्याचे प्रमाणपत्र दिले आहे. सदरचे वाहन आयशर टेम्पो हा किती लांबली रुंदीचा होता त्यामध्ये किती जनावरे वाहून नेण्याची क्षमता आहे याबाबतचा पुरावा देखील अभियोग पक्षाने अभिलेखावर आणणे आवश्यक होते परंतु तसा पुरावा अभिलेखावर नाही.

३०. अभियोगपक्षाचे फिर्यादी साक्षीदार पोलीस उपनिरीक्षक श्री. के.आर.राठोड (अ.सा.क्रं.१०),यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतात. दि.१४/०८/२०१९ रोजी ते पोलीस

स्टेशनला हजर असतांना पी.एस.ओ,श्री.एस.सी. सुर्यवंशी यांनी गुन्हयाचा तपास त्यांचेकडे दिला. त्यानंतर त्यांनी घटनास्थळी जावून दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा नि.क्रं ७३ तयार केला. त्यानंतर आरोपीकडून ०६ म्हशी, दोन बैल व एक आयशर टेम्पो असा मुददेमाल नि.क्रं ७४ वरील जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त केला. सदर मुददेमाल पावती नि.क्रं ७५ वर दाखल आहे. सदर प्राण्यांचे फोटो वस्तुक्रमांक अनुक्रमे अ–१ ते अ–७ वर दाखल आहेत. साक्षीदारांचे जाबजबाब नोंदवून घेतले. पोलीस ठाणे अंमलदार सुर्यवंशी यांनी पशु वैदयकिय अधिकारी यांना पत्र देवून जनावरांची वैदयकिय तपासणी करुन घेतली. सदर प्रकरणातील प्राणी त्यांच्या मालकास सुपुर्तनाम्याने परत ताब्यात देण्यात आले. सदर तपासामध्ये आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्याने त्यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

३१. आरोपीच्या वकीलामार्फत त्यांचा उलटतपास घेण्यात आला असता, त्यामध्ये त्यांनी मान्य केले की, तपास त्यांच्याकडे आल्यानंतर घटनास्थळाचा पंचनामा त्यांनी दुस–याच दिवशी केला. ज्यादिवशी त्यांच्याकडे तपास आला त्याच दिवशी जप्ती पंचनामा तयार केला. जनावरांचे वैदयकिय प्रमाणपत्र पोलीस ठाणे अंमलदार यांनी त्यांच्याकडे दिले होते. ठाणे अंमलदार यांनी त्यांच्याकडे तपास देतांना फिर्याद, प्रथम खबरी अहवालाची प्रत, वैदयकिय प्रमाणपत्र दिले होते. घटनास्थळ हे रहददारीचे ठिकाण असून त्याच्या आजूबाजूला लोकवस्ती व दुकाने आहेत. त्यांनी आजूबाजूच्या लोक वस्तीतील लोकांचे, दुकानदारांचे व फोटोग्राफरचा

जबाब नोंदविले नसल्याचे कथन केले.

**३२.** सदर साक्षीदार घटनेचे तपासी अधिकारी असून त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा व जप्तीपंचनामा घटनेच्या दुस–या दिवशी म्हणजेच दि १५/०८/२०१९ रोजी तयार केल्याचे दिसून येते. यावरुन घटनेच्या दिवशी फिर्यादी यांनी घटनास्थळी कोणताही घटनास्थळ अथवा जप्ती पंचनामा न करता सदरचे प्राणी व आयशर ताब्यात घेवून पोलीस ठाण्यात आणल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रत्यक्ष घटना घडतेवेळीची वस्तुस्थिती घटनास्थळ पंचनामा नि.क्रं ७३ व जप्ती पंचनमा ७४ वरुन दिसून येत नाही. त्यामुळे घटनेच्या वेळी सदर टेम्पोमध्ये ०६ म्हशी व दोन बैल निदर्ययीपणे खचाखच भरले होते ही बाब सिध्द करण्यासाठी केवळ पोलीस साक्षीदार व होमगार्ड यांचा तोंडी पुरावा विश्वासार्ह वाटत नाही.

**३३.** अभियोग पक्षाच्या एकंदरित पुराव्याचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, घटनेच्या वेळेस आरोपींच्या ताब्यातील वाहनात एकूण ०८ प्राणी/जनावरे त्यांना ईजा होईल व त्याच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीमध्ये, निर्दयीपणे, खचाखच भरुन वाहतूक करतांना आढळून आला व नमुद वाहनामध्ये परवानगीपेक्षा जास्त वजन भरुन म्हणजेच ०८ प्राणी/जनावरे बेकायदेशिररित्या वाहून नेत असतांना आढळून आला ही बाब अभिलेखावरील पुराव्यावरुन संशयापलिकडे जावून सिध्द होत नाही करिता मी मुद्दा क्र.१ ते ३ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करिताः</u>**

**३४.** मुद्दा क्र. १ ते ३ वरील निष्कर्षावरुन असे स्पष्ट होते की, संपुर्ण पुराव्याचे व कागदपत्राचे अवलोकन करता आरोपींविरूध्द सबळ पुरावा न आल्यामुळे त्याच्या विरूध्द गुन्हा सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपीं हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. करीता मुद्दा क्र.४ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

०१ आरोपी **एकनाथ किशनराव सुर्यवंशी रा. पिंपळकौठा, गोपालचावडी हदगाव जि.नांदेड** यांना भारतीय प्राण्यांना निर्दयीपणे वागणुक प्रतिबंध **कलम ११(१)(ड) भारतीय प्राण्यांना निर्दयीपणे वागणुक प्रतिबंध अधि.व कलम ८३/१७७ मोटार वाहन कायदा व भादवीचे कलम १०९** प्रमाणे या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

०२ आरोपीचे वैयक्तिक व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

०३ पोलिस स्टेशन तामसा यांच्याकडील मालमत्ता नोंदवही क्रं. ०६/२०१९ दि.३०/०८/२०१९ मधील जप्त मुद्देमाल खालीलप्रमाणेः-

| | | |
|---|---|---|
| १- | एक काळया रंगाची म्हैस वय ०३ वर्षे गोल शिंगे असलेली | रु. ५५,०००/- |
| २- | एक काळया रंगाची म्हैस वय ०३ वर्षे बारीक शिंगे असलेली | रु. ५५,०००/- |
| ३- | एक काळया रंगाची म्हैस वय ०५ वर्षे बारीक शिंगे असलेली | रु. ४०,०००/- |
| ४- | एक काळया रंगाची म्हैस वय ०५ वर्षे | रु. ६०,०००/- |
| ५- | एक काळया रंगाची म्हैस वय ०६ वर्षे | रु. १०,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ६– | एक काळया रंगाची म्हैस वय ०६ वर्षे | रु. १५०००/– |
| ७– | एक हरण्या रंगाचा उभे शिंग असलेला बैल | रु. १२,०००/– |
| ८– | एक पांढ–या रंगाचा बैल वय ०७ वर्षे | रु. १५०००/– |

०४ सदर जनावरांचे मालक शंकर दिगांबर नव्हाते, शिवाजी शंकर लोणारे, दामाजी गोविंदा सुर्यवंशी, मारोती रामजी कवळे,साहेबराव शंकर बामणे, शंकर किसन खांडरे, यांना त्यांचे म्हैस व बैल सुपुर्तनाम्याने अंतरिम ताब्यात दिले असून सदरचा सुपुर्तनामा रदद करुन सदर ताबा अपील कालावधीनंतर कायम करण्यात येतो.

०५ पोलीस स्टेशन तामसा यांच्याकडील जप्त मालमत्ता नोंदवही क्रं. ०६/२०१९ दि.३०/०८/२०१९ मधील एक आयशर कंपनीचे वाहन क्रं एम २६ ए.डी. १६२६ हे मुळ मालक बालाजी किशन सुर्यवंशी यांना सुपुर्तनाम्यावर अंतरिम ताब्यात दिली असून सदरचा सुपुर्तनामा अपील कालावधीनंतर रदद करण्यात येवून त्याचा ताबा कायम करण्यात येतो.

०६ फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ च्या तरतुदीनुसार वरिष्ठ न्यायालयातील अपिलामध्ये किंवा न्यायनिर्णया विरुध्द याचिकेमध्ये नोटीस मिळाल्यावर हजर राहण्याकरिता आरोपीने पुढील सहा महिन्यापर्यंत कायम राहील असा रक्कम रुपये १५,०००/– चा जामीन व वैयक्तिक बंधपत्र द्यावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)**

AMARJEET BHARATRAO JADHAV

Digitally signed by AMARJEET BHARATRAO JADHAV
Date: 2026.06.05 13:51:43 +0530

**(अमरजीत भारतराव जाधव)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, हदगाव,
जि. नांदेड.

ठिकाणः हदगाव.
दिनांकः ०५.०६.२०२६

## <u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, संगणक प्रणालीमध्ये क्रमावली नक्कल करुन घातलेल्या न्यायनिर्णयामध्ये शब्दनाब्द हा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नावः | – | अनिता एस. गोदाम, |
| न्यायालयाचे नावः | – | न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय, हदगाव, ता. हदगाव, जि. नांदेड. |
| न्यायनिर्णय/आदेशाचा दिनांकः | – | ०५/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय/आदेशावर पिठासन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याचा दिनांकः | – | ०५/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय संगणक प्रणालीमध्ये अपलोड केल्याचा दिनांकः | – | ०५/०६/२०२६ |

<u>Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app “**eCourts Services**” from Android or iOS</u>